MHAM180017262021

नियमीत दिवाणी दावा क्रं. ४४/२०२१

दत्तात्रय संस्थान .वि. चंद्रकला

## निशाणी क्रमांक ५ वरील आदेश

(दिनांक २६/१०/२०२१)

१. वादी/अर्जदाराने सदरचा अर्ज दिवाणी प्रकिया संहितेच्या ऑर्डर ३९, रूल १ व २ अंतर्गत तात्पुरत्या मनाई हुकुमाचा आदेश होण्याकरीता दाखल केला.

२. सदरच्या अर्जाचे वाचन केले. प्रतिवादीने त्यावर त्यांचे उत्तर न दाखल केल्याने सदरच्या अर्जावर दिनांक २४.०८.२०२१ रोजी आदेश पारित करुन सदरचा अर्ज प्रतिवादी /गैरअर्जदाराचे लेखी उत्तराशिवाय चालविण्यात आला. अर्जदारातर्फे विद्वान अधिवक्ता श्री. घाटोळे यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला. गैरअर्जदारातर्फे त्याचे विद्वान अधिवक्त्यांनी युक्तीवादाच्या वेळेला गैरहजर राहील्याने त्यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला नाही. अभिलेखावरील दोन्ही पक्षातर्फे दाखल केलेले दस्ताऐवजांचे अवलोकन करण्यात आले.

३. अर्जदाराच्या मते, त्यांच्या मालकीचे नगर परिषद वरुड हद्दीत नझुल सिट क. २३ सिटी सर्व्हे न. ३२९२ क्षे.१४७ चौ.मि. ही मिळकत असुन सदरची मिळकत दावा नकाशात ‘अ ब क ख’ या अक्षराने दर्शविली आहे. सदर मिळकतीस दाव्यातील वाद मिळकत संबोधण्यात आलेली आहे. दावा नकाशात नवीन बांधकाम म्हणुन दाखविलेल्या ठिकाणी पुर्वी साखरे महाराज यांची कच्ची झोपडी होती या झोपडीचे ठिकाणी गैरअर्जदारांनी नवीन विटा सिमेंट कॉन्क्रीटचे बांधकामास दि. ०५.०४.२०१९ रोजी सुरुवात केली. त्यापूर्वी दि. ०१.०४.२०२१ रोजी गैरअर्जदारांनी मंदीराला लागून उत्तरेकडे ‘झ’ या अक्षराने दावा नकाशात दाखविलेल्या जागेवर कच्चे

तुराटयाचे कुंपण घालुन व त्यावर टीणा टाकुन झोपडी तयार केली. तसेच दावा नकाशात xxxx या चिन्हाने दाखविल्याप्रमाणे वाद मिळकतीच्या पश्चिमेकडे तुराटयाचे कुपंण दि. ०१.०४.२१ रोजी गैरअर्जदारांनी निर्माण केले तसेच दि. ०७.०४.२०२१ रोजी ते दि. ०९.०४.२०२१ रोजी या कालावधीत 'प' या अक्षाराने दाखविलेल्या ठिकाणी गैरअर्जदारांनी पक्का संडास बांधला. अर्जदार दत्तात्रय संस्थानचे वाद मिळकतीमध्ये मंदीराचा झागो उर्फ सखाराम महाराज हे पुजारी म्हणुन काम करीत होते. त्यांच्या मृत्युनंतर त्याचे नातेवाईक गैरअर्जदार हे सदर झोपडीमध्ये राहुन दत्तात्रय मंदीराची साफसफाई व पुजाअर्चा करीत होते. त्यामुळे गैरअर्जदारांनी वाद मिळकतीवर स्वतःची मालकी दाखवणे सुरु केले आणि त्या अनुशंगाने मंदिरास लागून कच्ची झोपडी उभारुन तुराटयाचे कुपंण टाकुण संडासचे बांधकाम करुन दरवाजा लावला व त्यामुळे दत्तात्रय मंदीरामध्ये भावी भक्तांना नेहमी जाणे येणे करण्यास अडथळा निर्माण केला. त्यामुळे वादी/अर्जदाराने प्रतिवादीं/गैरअर्जदाराच्या विरुध्द पोलीस स्टेशन वरुड व नगर परिष्द वरुड यांच्याकडे तक्रार दाखल केली. परंतु गैरअर्जदारांचे वाद मिळकतीवरील अवैद्य बांधकाम आजही सुरुच आहे. त्यामुळे गैरअर्जदार/ प्रतिवांदीनी सदरचा अर्ज दाखल केला.

४. तर प्रतिवादी/गैरअर्जदार न्यायालयात हजर झाले. परंतु त्यांनी त्यांचे लेखी बयाण व लेखी उत्तर दाखल केलेले नाही. त्यामुळे या न्यायालयाने दि. २४.०८.२०२१ रोजी नि.क्र. ०१ वर आदेश पारित करुन सदर प्रकरण प्रतिवादी विरुध्द विनालेखी बयाणाशिवाय चालविणात आले. तसेच गैरअर्जदाराने उत्तर दाखल न केल्यामुळे सदर अर्जावर देखील

आदेश पारित करुन सदरचा अर्ज गैरअर्जदाराच्या लेखी उत्तराशिवाय पूढे चालविण्यात आला.

५. अर्जदाराचे कथना नुसार खालील मुददे माझे विचारार्थ निर्माण होतात व त्यावर मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १) | अर्जदाराची केस ही प्रथमदर्शनी आहे काय? | ..... | नाही |
| २) | सोईचे पारडे अर्जदाराचे बाजुने आहे काय? | ..... | नाही |
| ३) | तात्पुरते मनाई हुकुमाचा अर्ज नामंजुर केल्यास अर्जदाराची अपरिमीत हानी होणार काय? | ..... | नाही |
| ४) | आदेश काय ? | ..... | अंतिम आदेशाप्रमाणे अर्ज निशाणी क. ५ नामंजुर. |

## -: **कारणमिमांसा** :-

**मुददा क. १ ते ३ करीता** -

६. सदरहु मुद्दे क. १ ते ३ एकमेकांशी संबंधीत असल्याने तथ्यांची पुनरावृत्ती टाळण्याचे दृष्टिकोनातून सदरहु मुददे चर्चेकरीता एकत्रीतरित्या घेतलेले आहे.

७. प्रथमदर्शनी केस पाहण्याकरीता वादीचे कथन व त्या अनुशंगाने वादीने दाखल केलेले दस्तऐवजांचे मी अवलोकन केले.

८. अर्जदारातर्फे अधिवक्ता श्री. घाटोळे यांनी असा युक्तिवाद केला की, वाद मालमत्ता ही वादीचे मालकीची व वहिवाटीतील आहे. वाद मालमत्ता ही दत्तात्रय संस्थान मंदीर च्या नावे धर्मदाय आयुक्त अमरावती येथे नोंदणीकृत आहे. दावा मालमत्तेमध्ये दत्तात्रय यांचे पुरातन मंदीर असुन त्या मंदीराचा झागो उर्फ सखाराम महाराज साखरे बुवा हे पुजारी म्हणुन काम करीत होते आणि दावा नकाशात नवीन बांधकाम म्हणुन दाखविलेल्या ठिकाणी राहत होते. साखरेबुवा यांच्या मृत्युनंतर त्याचे नातेवाईक म्हणुन गैरअर्जदार हे सदर झोपडीमध्ये राहुन दत्तात्रय मंदीराची साफसफाई व पुजाअर्चा करीत होते. परंतु गैरअर्जदाराने झोपडीमध्ये राहत असल्याचा गैरफायदा घेवुन वाद मिळकतवर स्वतःची मालकी दाखविणे सुरु केले व त्या अनुशंगाने गैरअर्जदारांनी मंदीरास लागून कच्ची झोपडी उभारुन त्यास लागुन तुराटयाचे कुपंण टाकुन संडासचे बांधकाम करुन दरवाजा लावला व सदर मंदीरामध्ये भावीक भक्तांना नेहमी जाणे येणे करण्यास अडथळा निर्माण केला. त्यामुळे सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

९. वादीचे वादपत्र, सदरचा अर्ज व त्या अनुशंगाने वादीने दाखल केलेले दस्ताऐवजांचे अवलोकन केले तसेच वादी/अर्जदाराचे विद्वान अधिवक्त्यांचा युक्तिवाद विचारात घेतला.

१०. वादी/अर्जदाराच्या मते दाव्यातील जागेवर गैरअर्जदाराने

कोणत्याही प्रकारचे बांधकाम दाव्याचा निकाल लागेपर्यंत करु नये. तसेच वाद मिळकतीमध्ये जाणे-येणे करण्यास गैरअर्जदाराने अडथळा करु नये तसेच गैरअर्जदाराने बांधलेली झोपडी, कुपंण, दरवाजा व संडास हे पुर्णतः नष्ट करुन वाद मिळकतीमध्ये जाणे-येणे करण्यास गैरअर्जदाराने अडथळा करु नये या करीता सदरहु अर्ज दाखल केला.

११. वादी/अर्जदाराने त्याचे सदर अर्ज परिच्छेद क. ३ मध्ये नमूद केले की, दावा नकाशात नवीन बांधकाम म्हणुन दाखविलेल्या ठिकाणी पुर्वी साखरे महाराज यांची कच्ची झोपडी होती. या झोपडीच्या ठिकाणी गैरअर्जदाराने नवीन विटा सिमेंटच्या कान्कीटच्या कामास दि. ०५.०४.२०२१ रोजी सुरुवात केली व त्याही पुर्वी ०१.०४.२०२१ रोजी गैरअर्जदारांनी मंदीराला लागून उत्तरेकडे 'झ' या अक्षराने दाखविलेल्या जागेवर कच्चे तुराटयाचे कुपंण घालुन व त्यावर टिना टाकुन झोपडी तयार केली तसेच दावा नकाशात 'प' या अक्षराने दाखविलेल्या ठिकाणी गैरअर्जदारांनी पक्का संडास बांधला. तसेच सदर अर्ज परिच्छेद क. ०४ मध्ये अर्जदाराने नमुद केले की, साखरे बुवा यांच्या मृत्युनंतर त्याचे नातेवाईक म्हणुन गैरअर्जदार हे सदर झोपडी मध्ये राहुन दत्तात्रय मंदीराची साफसफाई व पुजाअर्चा करीत होते. तसेच सदर अर्ज परिच्छेद क. ०५ मध्ये अर्जदाराने नमूद केले की, गैरअर्जदाराने मंदीरास लागून कच्ची झोपडी उभारुन त्यास लागून तुराटयाचे कुंपण टाकुन संडासचे बांधकाम करुन दरवाजा लावला. तसेच सदर अर्ज परिच्छेद क. ०६ मध्ये अर्जदाराने नमूद केले की, वाद मिळकतीमध्ये असलेल्या झोपडीमध्ये राहत असल्याचा गैरफायदा घेवुन गैरअर्जदार क. १ ने मालमत्ता कर भरण्याच्या अनुशंगाने झोपडीची जागा

नगर परिषद वरुड च्या रेकॉर्डमध्ये स्वताःच्या नावाने लावून घेतल्याचे अर्जदार संस्थेच्या सभासदांना सन २०१८ मध्ये समजले. अशा प्रकारे अर्जदाराच्या कथनावरुन असे स्पष्ट होते की, वाद मालमत्तेमध्ये गैरअर्जदारांची झोपडी असुन ती नगर परिषद वरुड च्या रेकॉर्डमध्ये नमूद आहे. सदर मामल्यात वाद मालमत्तेमध्ये गैरअर्जदारांची ताबा वहीवाट असल्याचे स्पष्टपणे दिसुन येते. गैरअर्जदारांची ताबा वहीवाट ही बेकायदेशीर आहे या बाबतीत अर्जदाराने योग्य तो पुरावा दाखल केला नाही.

१२. अर्जदाराचे मते वाद मिळकत वादपत्र नकाशात दर्शविलेली 'अ ब क ख' ही त्याचे मालकीची आहे. वादीने दस्तयादी नि.क्र. १८ सोबत नोंदणीचे प्रमाणपत्र, सनद, नझुल नोंदवही व ७-१२ उतारा अभिलेखात दाखल केले आहेत. सदर दस्तांचे अवलोकन केले. परंतु दावा नकाशात दर्शविलेल्या प्रमाणे 'अ ब क ख' या अक्षराने दर्शविलेली वाद मिळकत ही वादीचे मालकीची आहे ही बाब या क्षणी स्पष्ट होत नाही तर त्या करीता दोन्ही पक्षांचे साक्ष पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर निश्चीत होईल.

१३. एकंदरीत वादी/अर्जदाराचे वाद कथन व सदरहु अर्जाचे कथनानुसार वाद मिळकत ही प्रतिवादी/गैरअर्जदाराचे कब्जा वहीवाटीत असुन नगर परिषद वरुडच्या रेकॉर्डमध्ये सुध्दा प्रतिवादी/ गैरअर्जदाराचे नावे नोंद असल्याचे स्पष्ट होते. अशा परिस्थीतीत प्रतिवादी/गैरअर्जदाराचे बांधकाम हे वादी/अर्जदाराचे मालकीचे जागेत असून ते बेकायदेशीर आहे याबाबतीत वादी/ अर्जदाराने योग्य तो पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे वादीची प्रथमदर्शनी केस दिसुन येत नाही. तसेच सोईचे पारडे

देखील वादीचे बाजुने नाही. तसेच वादीचे विनंती प्रमाणे प्रतिवादीची बांधलेली झोपडी, कुपंण, दरवाजा व संडास पुर्णतः नष्ट केल्यास वादीच्या तुलनेत प्रतिवादीचे अपरिमित हानी होईल. त्यामुळे मी मुददा क. १ ते ३ चे उत्तरादाखल माझे निष्कर्ष '**नकारार्थी**' नोंदवित आहे व मुददा क. ४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहेः-

## <u>आदेश</u>

१. वादीचा तात्पुरता मनाई हुकुमाचा अर्ज नि. क. ५ नामंजुर करण्यात येतो.

२. दोन्ही पक्षांनी आपआपला खर्च सहन करावा.

(सदर आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)

दिनांक २६/१०/२०२१.

(एम. आर. बागडे)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
वरुड.